# प्रेसनोट

दि. १०/०८/२०२३

## ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील अधीक्षक कार्यालयातील वरिष्ठ लिपीकावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | स्त्री, वय - ४६ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | गणेश सुरेश गायकवाड, वय ४९ वर्ष, वरिष्ठ लिपीक (वर्ग-३), अधीक्षक कार्यालय, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,५००/- रुपये (दोन हजार पाचशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०९/०८/२०२३ व दिनांक १०/०८/२०२३ |
| सापळा दिनांक | १०/०८/२०२३ |

ठिकाण :- चौथा मजला, नवीन इमारत, ससून हॉस्पीटल, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार या शासकीय सेवक असून त्यांचे १,०७,०००/- रुपयाचे वैद्यकिय देयक फाईल मंजुरीकरीता वैद्यकिय आवक-जावक विभाग, अधीक्षक कार्यालय, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे दिनांक २१/७/२०२३ रोजी सादर करण्यात आले होते. सदर वैद्यकिय देयकामध्ये त्रुटी न काढता फाईल पुर्ण करून देण्याकरीता लोकसेवक गणेश गायकवाड यानी ३,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक गणेश गायकवाड, वरिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या वैद्यकिय देयकामध्ये त्रुटी न काढता फाईल पुर्ण करून देण्याकरीता ३,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, तडजोडीअंती २,५००/- रुपये लाच रक्कम त्यांचे कार्यालयात पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

Nilkw ACP 10/8/23

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.